Cosmos Multidisciplinary Research E-Journal    Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal    Impact Factor 5.69    ISSN No. 2456-1665

# भारतीय लोकशाही प्रक्रिया

**प्रा. निहाळ आर. बी.**
राज्यशास्त्र विभाग,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
बदनापुर, जि. जालना

**प्रस्तावना:**

भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारताने संसदीय लोकशाही शासन पध्दत स्विकारली. बऱ्याच देशांमध्ये लोकशाही शासन पध्दत आहे. काही देशामध्ये संसदीय लोकशाही शासन पध्दती आहे तर काही देशांमध्ये अध्यक्षीय शासन पध्दत आहे. कोणतीही राजकीय व्यवस्था ही त्या प्रदेशातील तसेच त्या काळातील परिस्थितीनुसार तयार होते. कोणत्याही देशातील लोकशाही ही त्या देशातील संविधानानुसार चालत असते. भारताचे संवधिान लिहिण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आहे. भारतीय संविधानानुसार भारतीय लोकशाहीत संसदेतीची महत्त्वाची भूमिका आहे. भारताच्या संसदेत लोकसभा, राज्यसभा तसेच राष्ट्रपती यांचा समावेश होतो. तसेच भारतीय लोकशाही प्रकियेमध्ये न्यायव्यवस्थेची सुध्दा महत्त्वाची भूमिका राहिलेली आहे. भारतातची लोकशाही ही जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून ओळखली जाते. लोकशाही प्रक्रियेमध्ये लोकप्रतिनिधी हे जनेद्वारा प्रत्यक्षरित्या मतदानाद्वारे निवडणूकीच्या माध्यमातून निवडून दिले जातात.

लोकप्रतिनिधी निवडून देण्यात जनतेची महत्त्वाची भूमिका असते. जनता आपल्यातूनच एकाची लोकप्रतिनिधी म्हणून निवड करित असतात. लोकशाही प्रक्रियेमध्ये सरकार हे बहुमताच्या आधारावर निवडून दिले जाते. ज्या राजकीय पक्षाला स्पष्ट बहुमत प्राप्त होते तो राजकीय पक्ष सत्ता स्थापन करित असतो. म्हणून भारतीय लोकशाही मध्ये बहुमताला खुप महत्त्व आहे. भारताचे संविधान २६ जानेवारी १९५० रोजी लागू करण्यात आले. भारतीय सविंधानातील कलम ३२६ नुसार कोणतेही लिंग, जात, धर्म न पाहता प्रत्येकाला मतदानाचा अधिकार देण्यात आला आहे.

**उद्दिष्ट्येः**

१. भारतीय लोकशाही प्रक्रियेचा अभ्यास करणे

२. भारतातील लोकप्रतिनिधीचा अभ्यास करणे

३. भारतातील संसद आणि राज्यविधीमंडळाचा अभ्यास आणि न्यायव्यवस्थेचा अभ्यास करणे

**गृहितकेः**

१. भारतीय लोकशाही प्रक्रियेत संसद आणि न्यायव्यवस्थेने महत्त्वाची भुमिका निभावलेली आहे.

२. भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे.

३. भारत एकसंघ ठेवण्याचे तसेच भारताच्या विकासात लोकशाहीने महत्त्वाचे कार्य केले आहे.

**भारतीय लोकशाही प्रक्रियाः**

भारतीय लोकशाही मध्ये संसदेची महत्त्वाची भूमिका राहीलेली आहे. भारतामध्ये सत्तेचे विभाजन करण्यात आले आहे. त्यामध्ये केंद्रसरकार आणि राज्यसरकार यांच्यामध्ये सत्तेचे विभाजन करण्यात आले आहे. केंद्र सरकारमध्ये पंतप्रधान आणि त्यांचे मंत्रिमंडळ हे निर्णय घेत असतात तर राज्य सरकारमध्ये मुख्यमंत्री आणि त्यांचे मंत्रीमंडळ हे निर्णय घेत असतात. यांच्या निर्णयाचा परिणाम हा भारतीय लोकशाहीवर होत असतो. भारताने संघराज्य शासन पध्दत स्विकारली आहे. भारतीय संघराज्यामध्ये भारतीय राज्यघटनेचे स्वरूप हे लिखित स्वरूपाचे आहे. तसेच भारतीय संघराज्यात संविधानाला सर्वोच्चता दिलेली आहे. भारतीय संविधानामध्ये अधिकारांचे विभाजन करण्यात आलेले आहे. भारतीय संघराज्यात स्वतंत्र न्यायव्यवस्था दिलेली आहे. तसेच दुहेरी शासन निर्माण करण्यात आले आहे. शासन पध्दतीमध्ये केंद्रसरकार आणि राज्यसरकार असे विभाजन करण्यात आलेले आहे. अधिकाराच्या बाबातीत केंद्रसरकार हे राज्यसरकारपेक्षा अधिक प्रभावशाली ठरत असते.

एखाद्या कायद्या संदर्भात पेचप्रसंग निर्माण झाला तर केंद्रसरकारने केलेला कायदा हाच प्रभावशाली ठरत असतो. संसदेतील लाकसभा आणि राज्यसभा असे दोन सभागृह निर्माण करण्यात आलेले आहे. संसेदेतील लोकप्रतिनीधिंची निवड ही जनतेद्वारा प्रत्यक्षरित्या होत असतो. राज्यसभा हे स्थायी सभागृह आहे. तसेच राज्यसरकारमध्ये विधानसभा तसेच विधानपरिषद हे दोन सभागृह

निर्माण करण्यात आलेले आहे. विधानसभेतील लोकप्रतिनिधींची निवड ही जनतेद्वारा प्रत्यक्षरित्या होत असते. लोकसभेमध्ये निवडणूकीच्या माध्यमातून ज्या राजकीय पक्षाला स्पष्ट बहुमत प्राप्त होते ती राजकिय पक्ष सत्ता स्थापन करित असतो. तसेच विधानसभेत सुध्दा ज्या राजकिय पक्षाला स्पष्ट बहुमत प्राप्त होते तो राजकिय पक्ष त्या, राज्यात सत्ता स्थान करित असतो.

मंत्रिमंडळ हे संयुक्तरित्या संसदेला विशेष म्हणजे लोकसभेला जबाबदार असतात. जर एखाद्या मंत्र्याविरूध्द जर लोकसभेने अविश्वास ठराव पास केला तर संपूर्ण मंत्रिमंडळाला राजीनामा हा द्यावाच लागतो. पंतप्रधानांची नियुक्ती ही राष्ट्रपती करित असतात. तसेच इतर मंत्र्यांची नियुक्ति सुध्दा राष्ट्रपती पंतप्रधानांच्या सल्ल्याने करित असतात. तसेच राज्याच्या विधानसभेतील मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्याने करित असतात. भारतामध्ये स्वतंत्र न्यायपालीका निर्माण करण्यात आली आहे.

भारतीय राज्यघटनेच्या कलम १२४ नुसार सर्वोच्च न्यायालयाची स्थाना करण्यात आली आहे. भारतासाठी एक सर्वाच्च न्यायालय निर्माण करण्यात आले आहे. सर्वेच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र हे संपूर्ण भारतापुरते आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयाला प्रारंभिक अधिकार प्राप्त आहे. प्रारंभीक अधिकार क्षेत्र म्हणजे एखाद्या खटल्याची सुनावनी केवळ सर्वाच्च न्यायालय घेऊ शकते. प्रत्येक राज्यासाठी एक उच्च न्यायालय निर्माण करण्यात आले आहे. न्यायालयाचे प्रारंभिक अधिकार क्षेत्र हे त्या राज्यांपूरतेच मर्यादित असते. सर्वोच्च न्यायालय उच्च न्यायालय नियंत्रन ठेवते तर उच्च न्यायालय त्या राज्यातील कनिष्ठ न्यायालयावर नियंत्रण ठेवत असते.

**निष्कर्षः**

१. भारताचा विकास करण्यात लोकशाहीने महत्त्वाची भुमिका निभावलेली आहे.

२. भारतीय लोकशाही मजबूत करण्यात संसद, राज्यविधीमंडळ तसेच न्यायव्यवस्थेने महत्त्वाचे कार्य केले आहे.

३. लोकशाही प्रक्रियेमध्ये राष्ट्रपती आणि राज्यपाल यांनी सुध्दा महत्त्वाची भूमिका निभावलेली आहे.

**संदर्भः**

१. संपा. प्राचार्य डॉ. बाळ कांबळे, सह. संपादक एकनाथ खांदवे, भारतीय लोकशाही समोरील आव्हाने, डायमंड पब्लिकेशन्स.

२. डॉ. बी.वाय. कुलकर्णी, ‘‘भारतील संविधान शासन व राजकिय पक्रिया’’, एज्युकेशनल पब्लिशर्स

३. प्रा. शेख हाशम, ‘‘भारतीय शासन आणि राजनिती, विश्व पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्यूटर्स, नागपुर